# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/सह मुकाअ(मा/तं)/ D85661

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 30/12/15

## परिपत्रक

**विषय :- माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील भूखंड खाजगी विकासकामार्फत विकसीत करणेबाबत..**

संदर्भ : परिपत्रक क्र. मऔविम/सह मुकाअ(मातं)/११४/२०१०, दिनांक २०.०७.२०१०

माहिती तंत्रज्ञान उद्यानात आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रातील तसेच, औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यानातील इमारतीमधील जागेचे पहिले हस्तांतरणासाठी वरील संदर्भिय परिपत्रकामधील धोरणानुसार कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. सदर सवलत ही परिपत्रकाच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यंत म्हणजेच दि. २०.०७.२०१५ पर्यंत अस्तित्वात होती. परंतु माहिती तंत्रज्ञान उद्यानमधील भूखंडधारक माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सध्याची घसरण तसेच जागतिक मंदी इत्यादीमुळे संकटात सापडलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्योगाला प्रोत्साहित करणेकरीता उद्योजकांनी बांधलेल्या इमारतीमधील गाळ्यांच्या पहिल्या हस्तांतरणाचा कालावधी वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाल्याने त्याबाबतचा विषय दि.२२.०६.२०१५ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ५५०८ पारीत करण्यात आला आहे.

सदर ठरावानुसार माहिती तंत्रज्ञान उद्यान आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) तसेच औद्योगिक भूखंडाचे माहिती तंत्रज्ञान भूखंडामध्ये रुपांतर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील गाळा हस्तांतरणाकरीता महामंडळाच्या दि. २०.०७.२०१० च्या परिपत्रकानुसार निर्गमित केलेल्या धोरणास अनुसरुन माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील युनिट/गाळे यांच्या पहिल्या हस्तांतरणाकरीता म्हणजेच दि २०.०७.२०१५ ते १९.०७.२०२० या पाच वर्षाकरीता कोणतेही हस्तांतर शुल्क आकारण्यात येऊ नये.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(विक्रम कुमार)
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.

५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.